# bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक — फेब्रुवारी – मार्च २००९ चा एकत्रित अंक

अंतरंग –


- हात धुणे प्रकल्प गाव नियोजन प्रक्रियेचा भाग म्हणून प्रोत्साहन
- गर्ल्स गेनिंग ग्राउंड.
- समुपदेशकांचा नवा उपक्रम.
- यशोदा प्रकल्प - योग्य शिशू आहार देण्यासंबंधी वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रम.
- बांधकामाच्या जागेवरील डे केअर सेंटर्स प्रकल्प - स्वयंसहायता गटांचा अनुभव.


## आजपर्यंत



नवापूरच्या प्रशिक्षणार्थींना हातधुणे प्रकल्पातील खेळ स्पष्ट करताना

### हात धुणे प्रकल्प गाव नियोजन प्रक्रियेचा भाग म्हणून प्रोत्साहन :-

वस्तीपातळीवरील वैयक्तिक स्वच्छता सशक्त होईल अशी, हात धुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल मोहिमेची रचना (हिंदुस्थान लिवर लिमिटेडच्या लाईफबॉय स्वास्थ्य चेतना कार्यक्रमावर आधारित)नवीन अगदी अनुरुप करण्यात आली आहे. ही मोहिम युनिसेफच्या गावाच्या सूक्ष्म नियोजन प्रक्रियेत अंतर्भूत करण्यात आली आहे.

युनिसेफव्दारा प्रेरित गाव नियोजन प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान एक दिवसाचे देवाणघेवाणयुक्त प्रशिक्षण, नंदुरबार जिल्हयातील नवापूर तालुक्यातील ४० प्रशिक्षकांना देण्यात आले. युनिसेफच्या डॉ.दीपक यांच्या नेतृत्वाखाली ओगिल्व्हीच्या प्रशिक्षकांनी १६ मार्च २००९ रोजी हे प्रशिक्षण दिले.

नवापूर तालुक्यातील सर्व गावांमधील सूक्ष्म नियोजन प्रक्रियेदरम्यान विविध गटांना उदा.मुले, माता आणि मजूरवर्ग यांना, साबणाने हात धुण्याचे महत्व पटवून देणारे संदेश हया प्रशिक्षकांनी छोटे गट स्थापन करुन, पोहोचवायचे आहेत.

### गर्ल्स गेनिंग ग्राउंड :-

प्रकल्पातील सर्व कार्यक्षेत्रातील मुलींबरोबर अभ्यासक्रमाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आश्रमशाळेमधे अभ्यासक्रमाचा दुसरा टप्पा सात कार्यक्षेत्रात पूर्ण झाला आहे. आश्रमशाळेचे शैक्षणिक वर्ष एप्रिल २००९ मध्ये संपत आल्यामुळे वेळ कमी मिळाला. त्यामुळे आधीच्या नियोजनानुसार सत्रे घेता आली नाहीत. सत्रांबरोबर कार्यशाळा, शिबीर आणि प्रदर्शनांसारखे कार्यक्रम एकत्र करुन सत्रे घेण्यात आली. सर्व कार्यक्षेत्रात प्रेरकांच्या अभ्यासक्रम प्रशिक्षणाचा दुसरा हप्ता सुरु झाला आहे.

### किशोरी शक्ती योजना सशक्त करण्यासाठी जीजीजीचा सहभाग :-

एकात्मिक बाल विकास योजनेच्या अधिकाऱ्यांनी , ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील आरोहण (स्थानिक संस्था) संस्थेला त्यांच्या किशोरी शक्ती योजनेअंतर्गत , तालुक्यातील किशोरवयीन मुलींचे प्रशिक्षण घेण्याची विनंती केली. तालुक्यातील वेगवेगळया पाडयांमधील , वेगवेगळया सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या ४१३ शिक्षित वा अशिक्षित मुलींनी हया प्रशिक्षणात सहभाग घेतला. दिवसभराच्या कार्यक्रमात सर्व विषय पूर्ण होणे शक्य नसल्याने, मासिक पाळीचे चक्र आणि वैयक्तिक स्वच्छता, किशोरवय, आपले शरीर आणि प्रजनन आरोग्य हया महत्वाच्या विषयांची सत्रे घेता येतील अशी प्रशिक्षणाची रचना करण्यात आली.

जी जी जी कार्यक्रमाचा विस्तार होण्यासाठी आणि एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाची किशोरी शक्ती योजनेत अधिक गुणात्मक वाढ होण्यासाठी या प्रशिक्षणाची मदत झाली.

बहुतेक सर्व गावांत सत्रे जोरात सुरु असली तरी सर्व गावातील लोक जगण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी जवळच्या शहरांकडे स्थलांतर करत असल्यामुळे , कार्यक्रमापुढे आव्हानेही आहेत. त्याचा परिणाम काही प्रमाणात झाला आहे.

## रक्तक्षय तपासणी शिबीरे :-



भंडोरा, ता.चिखलदरा, अमरावती या गावातील रक्तक्षय तपासणी शिबीर

*जानेवारी – फेब्रुवारी २००९ या कालावधीत कार्यक्षेत्रातील सर्व ठिकाणी मुलींची रक्तक्षय तपासणी शिबीरे आयोजित करण्यात आली होती. तपासणीसाठी आवश्यक रिएजंटचा अभाव, गावापासून प्राथमिक आरोग्य केंद्राचे अंतर, मुलींना प्राथमिक आरोग्य केंद्रात जाण्यात येणाऱ्या अडचणी आणि रोजगाराच्या शोधात मुलींचे होणारे स्थलांतर, अशा कारणांमुळे काही ठिकाणी ही शिबीरे पूर्ण होऊ शकली नाहीत.*

## फूड डायव्हर्सिफिकेशन :-

फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्पातील गोळा केलेल्या माहितीचे परीक्षण, श्रीराम अहिरराव मेमोरियल ट्रस्टच्या गटाकडून पूर्ण करण्यात आली आहे. हया प्रकल्पाचे गुणात्मक परीक्षण, हया महिनाअखेरीस, एकात्मिक बाल विकास यंत्रणा, ताज, आय.एच.एम.ए, राजमाता जिजाऊ माता आणि बालक आरोग्य आणि पोषण मिशन, युनिसेफ, एस.ए.एम.टी, टी. आय.एस.एस, ए .डब्ल्यू. टी.सी आणि भविष्य अलायन्स या सर्वांच्या प्रतिनिधीं मार्फत एकत्रितपणे करण्यात येत आहे. आधीच निश्चित करण्यात आलेले निर्देशांक, त्या भागातील निरीक्षणातून मिळालेली माहिती आणि अंतिम सर्व्हेक्षण या सर्व गोष्टींवर आधारित मूल्यमापन करण्यात येईल.

## यशोदा प्रकल्प– योग्य शिशू आहार देण्यासंबंधी वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रम:-

एच.यू.एल., युनिसेफ,ग्रीन केटल कन्सल्टिंग, क्वान्टम रिसर्च आणि भविष्य अलायन्सच्या प्रतिनिधींनी नंदुरबारच्या गावांमध्ये तिथल्या शिशू आहारासंबंधी सवयी व त्यातील अडथळे समजून घेण्यासाठी एकत्रित भेट दिली. हया भेटीचा परिणाम म्हणून सपाटीवरील गावे व डोंगराळ भागातील गावासाठी वेगवेगळया स्वरुपाचे सहा भाग निश्चित करण्यात आले आहेत. सपाटीवरील गावांसाठी तीन व डोंगराळ भागातील गावांसाठी तीन उदाहरणार्थ:- ज्या माता पूरक खाणे वेळेत सुरु करत नाहीत अशा माता (सुमारे ५२%), सुचविल्यानुसार प्रमाण, गुणवत्ता आणि वेळेनुसार पूरक खाणे सुरु केलेल्या माता (सुमारे ११%) आणि त्या माता ज्या पूरक खाणे सुरु करतात पण योग्य पध्दतीत देत नाहीत अशा माता (सुमारे ३७%) असे ते प्रत्येकी तीन भाग आहेत.

प्रत्येक भागासाठी वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रमाचे वेगवेगळे डावपेच आखावे लागतील कारण एक कार्यक्रम सर्व भागांना योग्य ठरणार नाही.

## बांधकामाच्या जागेवरील डे केअर सेंटर्स प्रकल्प - स्वयंसहायता गटांचा अनुभव:-



प्रतिक्षानगर येथील स्वयंसहायता गटाची बैठक

बांधकाम मजुरांच्या ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना कोणत्याच प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत. या मुलांच्या आरोग्य, पोषण आणि शाळापूर्व शिक्षणाच्या गरजा भागवू शकेल असे पूर्णपणे कार्यरत अंगणवाडी तथा डे केअर सेंटर चालवणे हया कार्यक्रमातून अपेक्षित आहे. इतर अंगणवाडी केंद्रातील मुलांना दिल्या जाणाऱ्या पूरक खाण्यानुसार हया मुलांना पूरक खाणे देण्यासाठी स्वयं सहायता गट महत्त्वाचा आहे. प्रकल्पाच्या सुरुवातीला बांधकाम प्रकल्पावरील मातांचे स्वयंसहायता गट बनवायचे असा विचार केला होता. जेणेकरुन हया

प्रक्रियेत संबंधित वस्तीचाही सहभाग झाला असता आणि केंद्रावरील मुलांना खाणे देण्यासाठी एकागटाला जबाबदारी देता आली असती. केंद्र आठ तास चालू राहात असल्याने दुसऱ्या गटावर जबाबदारी देणे टाळता आले असते.

*हे स्वयंसहायता गटबांधणीसाठी पुढीलप्रमाणे आव्हाने समोर आली:*

१) स्थलांतर करीत असल्यामुळे निवासाचा पुरावा देण्यास असमर्थ असल्याने बँकखाते उघडता येत नव्हते.

२) निवासाचा पुरावा बांधकाम व्यावसायिकाने देखील देण्यास नकार दिला कारण स्वयंहायता गटांनी कर्ज घेतले आणि ते फेडले नाही तर तो व्यावसायिक अडचणीत आला असता.

३) स्वयंसहायता गटाला कुठल्याही प्रकारची अग्रिम रक्कम मिळत नसताना, गटांची कामाची प्रेरणा कायम ठेवणे. कारण एकात्मिक बाल विकास यंत्रणेने विशेष प्रकल्प म्हणून हया गटांना मंजुरी देण्यातील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यास वेळ लावला.

४) हे लोक स्थायी नसल्याने गट म्हणून कार्यरत राहणे कठीण होते तरीही काही काळपर्यंत तेथे रहातील अशाच मातांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. सदस्यांमधील बदल वेळोवेळी बँकेला कळवणे आवश्यक असेल.

प्रतीक्षा नगर आणि गणेशनगर येथील बांधकाम प्रकल्पांवरील स्वयंसहायता गटांपैकी दोन नव्या गटांचे आता स्वत:चे बँक खाते उघडण्यात आले आहे. एकात्मिक बाल विकास कार्यक्रमांतर्गत खाणे पुरविण्यासाठी हया गटांना विशेष बाब म्हणून मान्यताही मिळाली आहे. अशा प्रकारच्या तरतुदी तयार करण्याबद्दल एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी खास प्रयत्न केले आणि त्याबरोबर स्वयंसहायता गटाच्या तांत्रिक बाबींची पूर्तता केली म्हणून त्यांचे मन:पूर्वक धन्यवाद!



खारघर, नवी मुंबई येथील बांधकाम प्रकल्पाच्या जागेवरील डे केअर सेंटर

वरील अनुभव लक्षात घेता, खारघर मधील बांधकाम प्रकल्पांवरील डे केअर सेंटरवर मुलांना खाणे पुरविण्यासंबंधी वेगळा प्रयत्न करुन बघितला जात आहे. नवीन स्वयंसहायता गट तयार करण्याऐवजी, एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या अस्तित्वात असलेल्या गटांनाच खाणे पुरविण्यासाठी सहभागी करुन घेतले जात आहे. एकात्मिक बाल विकास यंत्रणेने तांत्रिक बाबी कमी केल्या व मुलांना खाणे लवकर सुरु करता आले. मुंबई मोबाईल क्रेशेसकडून बाकीच्या वेळचे खाणे दिले जाते. एकात्मिक बाल विकास यंत्रणेकडून येणारे खाणे आणि केंद्रात बनविले जाणारे खाणे, सर्व मुले वाटून घेतात.

हया दोघांपैकी कोणता नमुना इतर ठिकाणी सहज राबविता येईल याबाबत तपासणी सुरु आहे.

-------------********---------------

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२-२७८२४६२९